रजिस्ट्री सं. डी. 281

Price : Rs. 5.00
REGISTERED No. D-221
नोंदणी क्रमांक डी-221

भारत का राजपत्र
The Gazette of India
भारताचे राजपत्र

असाधारण
EXTRAORDINARY
असाधारण

भाग 12 अनुभाग 1
Part XII Section 1
भाग बारा अनुभाग 1

प्राधिकार से प्रकाशित
PUBLISHED BY AUTHORITY
प्राधिकाराद्वारे प्रकाशित

| | | |
|---|---|---|
| सं. 1 ] | नई दिल्ली, जनवरी 19-25, 2023/पौष 29-माघ 5 (शक) 1944 | [खंड 21 |
| No. 1 ] | NEW DELHI, JANUARY 19-25, 2023/PAUSHA 29-MAGHA-5 (SAKA) 1944 | [Vol. 21 |
| अं. १ ] | नवी दिल्ली, जानेवारी १९-२५, २०२३/पौष २९-माघ ५ (शके) १९४४ | [खंड २१ |

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

**विधि और न्याय मंत्रालय**

(विधायी विभाग)

नई दिल्ली,

(1) दि मेजॉरिटी ॲक्ट, 1875 ; (2) दि ऑफिशल् ट्रस्टी ॲक्ट, 1913 ; (3) दि लीगल् सर्विसेस् ऑथोरिटी ॲक्ट, 1987 ; (4) दि गुडस् ॲन्ड सर्व्हिसेस् टॅक्स (कॉम्पेन्सेशन टू स्टेट) ॲक्ट, 2017 के मराठी अनुवाद राष्ट्रपती के प्राधिकार से प्रकाशित किये जाते है और ये प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, 1973 (1973 का 50) की धारा 2 के खण्ड (क) के अधीन उनके मराठी प्राधिकृत पाठ समझे जायेंगे।

## MINISTRY OF LAW AND JUSTICE

(LEGISLATIVE DEPARTMENT)

New Delhi,

The Translation in Marathi of (1) The Majority Act, 1875 ; (2) The Official Trustees Act, 1913 ; (3) The Legal Services Authorities Act, 1987 ; (4) The Good and Services Tax (Compensation to States) are hereby published under the authority of the President and shall be deemed to be the authoritative texts thereof in Marathi under clause (*a*) of Section 2 of the Authoritative Texts (Central Laws) Act, 1973 (50 of 1973).

## विधि व न्याय मंत्रालय

(विधायी विभाग)

नवी दिल्ली,

(१) दि मेजॉरिटी ॲक्ट, १८७५ ; (२) दि ऑफिशल् ट्रस्टी ॲक्ट, १९१३ ; (३) दि लीगल् सर्विसेस् ऑथोरिटी ॲक्ट, १९८७ ; (४) दि गुडस् ॲन्ड सर्व्हिसेस् टॅक्स (कॉम्पेन्सेशन टू स्टेट) ॲक्ट, २०१७ यांचा मराठी अनुवाद याद्वारे, राष्ट्रपतीच्या प्राधिकारान्वये प्रसिद्ध करण्यात येत आहे आणि तो, प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, १९७३ (१९७३ चा ५०) याच्या कलम २ च्या खंड (क) अन्वये मराठीतील त्यांचा प्राधिकृत पाठ असल्याचे मानण्यात येईल.

## निर्देशसूची

## INDEX



| अनुक्रमांक<br>Serial No.<br>(१) | अधिनियमाचे नाव<br>Name of the Act<br>(२) | पृष्ठ क्रमांक<br>Page No.<br>(३) |
|---|---|---|
| १ | सज्ञानता अधिनियम, १८७५<br>The Majority Act, 1875 | ५ |
| २ | शासकीय न्यासी अधिनियम, १९१३<br>The Official Trustees Act, 1913 | ७ |
| ३ | विधि सेवा प्राधिकरण अधिनियम, १९८७<br>The Legal Services Authorities Act, 1987 | १९ |
| ४ | वस्तू व सेवा कर (राज्यांना भरपाई) अधिनियम, २०१७<br>The Goods and Services Tax (Compensation to States) Act, 2017 | ४१ |

## सज्ञानता अधिनियम, १८७५

## (१८७५ चा अधिनियम क्रमांक ९)[१]

[५ एप्रिल, २०२२ रोजी यथाविद्यमान]

[२ मार्च, १८७५]

**सज्ञान वयासंबंधीचा कायदा विशोधित करण्यासाठी अधिनियम.**

**उद्देशिका.** ज्याअर्थी, [२][भारतात] अधिवासी असलेल्या व्यक्तींच्या बाबतीत, [३][सज्ञानतेचे वय विनिर्दिष्ट करणे] इष्ट आहे ; त्याअर्थी, याद्वारे पुढीलप्रमाणे अधिनियमित करण्यात येत आहे :—

**संक्षिप्त नाव.** **१.** या अधिनियमास, [४][***] सज्ञानता अधिनियम, १८७५, असे म्हणावे.

**स्थानिक विस्तार.** [५][त्याचा विस्तार, [६][जम्मू व काश्मीर राज्यखेरीज करून] संपूर्ण भारतभर आहे.]

**प्रारंभ आणि प्रवर्तन.** आणि तो पारित झाल्यापासून तीन महिने संपल्यानंतरच केवळ अंमलात येईल आणि परिणामकारक होईल.

**व्यावृत्ती.** **२.** यात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे,—

(क) पुढील बाबतीत (म्हणजेच,—विवाह, देज, घटस्फोट आणि दत्तकग्रहण यांसंबंधी व्यवहार करण्याची कोणत्याही व्यक्तीची क्षमता ;

(ख) [७][भारताच्या नागरिकांच्या] कोणत्याही वर्गाचा, धर्म किंवा धार्मिक विधी आणि परिपाठ ; किंवा

(ग) हा अधिनियम अंमलात येण्यापूर्वी जी, तिला लागू असणाऱ्या कायद्याअन्वये सज्ञान झालेली असेल अशा कोणत्याही व्यक्तीची क्षमता,

यांच्यावर परिणाम होणार नाही.

---

१. हा अधिनियम, १९६३ चा विनियम ६ याच्या कलम २ आणि पहिली अनुसूची यांद्वारे दादरा व नगर हवेलीवर, आणि १९६५ चा विनियम ८ याच्या कलम ३ आणि अनुसूची यांद्वारे संपूर्ण लक्षद्वीप संघराज्य क्षेत्रांवर विस्तारित करण्यात आला. हा अधिनियम १९६८ चा अधिनियम क्रमांक २६ द्वारे खालील फेरफारास अधीन राहून पुदुचेरीवर विस्तारित करण्यात आला. कलम १ मध्ये अखेरीला पुढील मजकूर दाखल करावा :—

"परंतु, या अधिनियमात अंतर्भूत असलेली कोणतीही गोष्ट, पुदुचेरी या संघ राज्यक्षेत्रात रेनोकांत्स यास लागू होणार नाही."

२. १९५१ चा अधिनियम ३ याच्या कलम ३ व अनुसूची यांद्वारे "भाग क राज्ये व भाग ग राज्ये यांमध्ये" या मजकुराऐवजी दाखल केला.

३. १९९९ चा अधिनियम ३३ याच्या कलम २ द्वारे "अज्ञानदशेचा कालावधी वाढवणे आणि सज्ञान वयासंबंधात आहे त्यापेक्षा अधिक एकरूपता आणि निश्चितता साधणे" या मजकुराऐवजी दाखल केला (१६ डिसेंबर, १९९९ रोजी व तेव्हापासून).

४. वरील अधिनियमाच्या कलम ३ द्वारे "भारतीय" हा मजकूर वगळला (१६ डिसेंबर, १९९९ रोजी व तेव्हापासून).

५. अनुकूलन आदेश, १९५० द्वारे मूळ परिच्छेदाऐवजी दाखल केला.

६. १९५१ चा अधिनियम ३ याच्या कलम ३ व अनुसूची यांद्वारे "भाग ख राज्ये खेरीजकरून" या मजकुराऐवजी दाखल केला.

७. अनुकूलन आदेश, १९५० द्वारे "हिजमॅजेस्टीच्या भारतातील कोणत्याही प्रजाजनवर्गाचा" या मजकुराऐवजी दाखल केला.

**भारतात अधिवासी असलेल्या व्यक्तींचे सज्ञानतेचे वय.**

[१][**३.** (१) भारतातील अधिवासी असलेली प्रत्येक व्यक्ती, तिच्या वयाला अठरा वर्षे पूर्ण होतील तेव्हा सज्ञान झाल्याचे मानण्यात येईल, मात्र, त्यापूर्वी नाही.

(२) कोणत्याही व्यक्तीचे वय मोजताना, ती ज्या दिवशी जन्माला आली होती तो संपूर्ण दिवस म्हणून समाविष्ट करावयाचा आहे आणि ती व्यक्ती, त्या दिवसाच्या अठराव्या वर्षदिनाच्या आरंभी सज्ञान झाली असल्याचे मानण्यात येईल.]

---

१. १९९९ चा अधिनियम ३३ याच्या कलम ४ द्वारे, कलम ३ व कलम ४ ऐवजी दाखल केले.